**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 10/07/2026

**आरोपी खाजगी इसम** :- श्रीमती शैला शशिकांत बोऱ्हाडे, अधिकृत स्टॅम्प विक्रत्या यांनी तक्रारदार यांचेकडुन 100/- रुपये किमतीच्या 7 बाँड पेपरवर 140/-रुपये अतिरीक्त कमिशन म्हणुन लाचेची मागणी करुन लाच स्विकारल्याने आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे एम.आय.डी.सी वाळुज, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | श्रीमती शैला शशिकांत बोऱ्हाडे, वय 54 वर्षे, व्यावसाय अधिकृत स्टॅम्प विक्रते, रा.एसएस.52, मीनाताई ठाकरे मार्केट, महाराणा प्रताप चौक, बजाजनगर, वडगाव कोल्हाटी, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 100/- रुपये किमतीच्या 7 बाँड पेपरवर प्रत्येकी 20 रुपये प्रमाणे 140/-रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | 100/- रुपये किमतीच्या 7 बाँड पेपरची शासकीय किम्मत 700 व त्या व्यतीरीक्त 140/-रुपये |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री.अमोल सोनवणे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्रीमती.प्रतिभा अबुज, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना आवश्यक असलेल्या 100/- रु. किमतीचे बँड पेपरव शासनाने ठरवुन दिलेल्या मोबदल्या व्यतीरीक्त अधिक कमिशन म्हणुन. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार या सामाजिक कार्यकर्त्या असुन सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष पदावर कार्यरत आहेत ,त्यांना त्यांचे संस्थेसाठी सात बॉण्ड पेपरची आवश्यकता होती, त्या कारणास्तव तक्रारदार या दिनांक 08/ 07/ 2026 रोजी बाँड घेण्यासाठी त्या गावातील अधिकृत विक्रेते आलोसे श्रीमती बोऱ्हाडे यांच्याकडे जाऊन 07 बाँड पेपर 100/- रुपये दराचे घ्यायचे आहेत असे म्हणाल्या त्यावर आलोसे श्रीमती बोऱ्हाडे यांनी 840/- रुपये द्यावे लागतील असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी ते कसे असे विचारले असता, आलोसे यांनी प्रतिबॉन्ड 120/- रुपये प्रमाणे सात बॉण्ड ची किंमत 840/- रुपये तुम्हाला द्यावे लागतील अशा स्वरूपाची मागणी केली तक्रारदार यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंध विभाग छत्रपती संभाजी नगर येथे समक्ष येऊन दि.09/07/2026 रोजी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 09/07/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली. त्यावेळी यातील इतर लोकसेवक श्रीमती शैला बोऱ्हाडे यांनी तक्रारदार यांचे कडे 100/- रु. किमतीचे 7 बाँड साठी शासनाने ठरवुन दिलेल्या मोबदल्या व्यतीरीक्त प्रती बाँड 20 रुपये प्रमाणे एकुण 140/- रुपये मागणी केली.<br>तसेच दिनांक 10/07/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार हया इलोसे यांचे राहते घरी बॉड घेण्यासाठी गेल्या असता इलोसे बोऱ्हाडे यांनी तक्रारदार यांचे कडुन 100/- रुपये किमतीचे एकुण 7 बाँड करीता 700/- रुपये व त्या व्यतीरीक्त 140/- रुपये असे एकुण 840/- रुपये रक्कम स्विकारल्या नंतर इलोसे श्रीमती बोऱ्हाडे यांना ताब्यात घेण्यात आले.<br>आरोपी इतर लोकसेवक यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.वाळुज येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री.अमोल शिंदे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पो.नि.श्रीमती प्रतिभा आबुज, पो.अंम.विलास चव्हाण,पो.अंम.प्रकाश डोंगरदिवे, पो.अंम.चांगदेव बागुल, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9870145915 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

स्वाक्षरीत
पोलीस उप अधीक्षक,
ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.